वाचा :- १) गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती दिंडोरी यांचे कडील पत्र क्रमांक पंसदि/शि/आ-३/ ८२२/१५ दिनांक १७/७/२०१५

२) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील ज्ञापन क्र.शि/प्राथ-९/७८६/२०१५ दि.१९/८/२०१५

३) श्री.दिनकर आधार पवार प्राथ.शिक्षक यांनी ज्ञापनास दिलेला खुलासा दि.३१/८/२०१५

४) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/९४६/२०१५ दि.५/१०/२०१५

५) सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडील अहवाल क्र.विशा ४/खाचौ/ सीआर २६३/२०१५ दिनांक ३/८/२०१६.

६) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/२६३/२०१७ दि.१७/५/२०१७

७) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक :१६/८/२०१७.

---

आदेश

शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.नाशिक
जा.क्र./शिक्षण/प्राथ-९/६०७/२०१७
दिनांक १६/८/२०१७

ज्याअर्थी श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक जि.प.प्रा.शाळा,पिंपळगाव ता.दिंडोरी जि.नाशिक येथे काम करीत असतांना, आरोप क्र.१) सन २०११-१२ मध्ये ६ वर्ग खोल्यांचे बांधकाम वेळेत पुर्ण न करणे, आरोप क्र.२) वर्ग खोल्यांचे बांधकाम वेळेत पुर्ण केल्याने विद्यार्थ्यांना शालेय सुविधा पासून वंचीत ठेवणे,याव्दारे शासकिय कामकाजात गैरवर्तणूक व नियमबाहय वर्तन केल्याने संदर्भ क्र.१ गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती दिंडोरी यांचे कडील पत्र क्रमांक पंसदि/शि/आ-३/८२२/१५ दिनांक १५/७/२०१५ अन्वये श्री.पवार प्रा.शि यांचे विरुध्द खाते निहाय चौकशी करणे कामी दोषारोप पत्र क्र.१ ते ४ सादर करण्यात आले होते.

ज्याअर्थी श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक यांना संदर्भ क्र. २ मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील ज्ञापन क्र.शि/प्राथ-९/७८६/२०१५ दि.१९/७/२०१५ अन्वये यांचे ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ बजाविण्यात आले असून सदर ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला श्री.पवार प्रा.शि यांनी दि. ३१/८/२०१५ रोजी खुलासा सादर केलेला आहे.

ज्याअर्थी श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक यांनी ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला दिलेला खुलासा दि.३१/८/२०१५ असमाधान कारक असल्याने संदर्भ क्रमांक ४ अन्वये मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/९४६/२०१५ दि.५/१०/२०१५ अन्वये सहाय्यक आयुक्त चौकशी यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती

ज्याअर्थी या आरोपाबाबत सविस्तर चौकशी करुन मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांनी संदर्भ क्र.५ अन्वये क्र.विशा ४/खाचौ/सीआर/२६३/२०१५ दिनांक ३/८/२०१६.रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे. उक्त चौकशी अहवालावरुन सहाय्यक आयुक्त चौकशी तथा चौकशी अधिकारी यांनी श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक यांचे विरुध्दात असलेले एकूण २ आरोपापैकी ,आरोप क्र.१ सन २०११-१२ मध्ये ६ वर्ग खोल्यांचे बांधकाम वेळेत पुर्ण न करणे, हा आरोप अशंत: सिध्द झाल्याने श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे, असा अहवाल सादर केला आहे.

ज्याअर्थी श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग ४ मधील कलम २ नुसार त्यांची दोन वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने बंद का करण्यात येवू नये ? याबाबत संदर्भ क्र.६ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/४७२/२०१७ दि.१७/५/२०१७ अन्वये देण्यांत येवुन त्याबाबतचा खुलासा २१ दिवसांच्या आंत सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

ज्याअर्थी श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक यांनी अंतिम कारणे दाखवा नोटीसीला खुलासा सादर केला नाही.त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेचे सिध्द होते.

त्याअर्थी श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक यांना त्यांचे विरुध्द खातेचौकशी प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्ती प्राधिकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग ३ नियम ४ (२) नुसार श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक यांची दोन वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने बंद करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

15/08

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

**प्रति-** श्री.दिनकर आधार पवार प्राथमिक शिक्षक जि.प.प्रा.शा.दिक्षी ता.निफाड जि.नाशिक

प्रत :- गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती दिंडोरी / निफाड जि.नाशिक